Vol-1 Issue-1
April 2021


ISSN-2250-0383
IMPACT FACTOR - 0.421

ITIHAS SANKALAN SANSTHA, MAHARASHTRA

ITIHAS SANKALAN PATRIKA

# SHODHANKAN

International
Half Yearly
Peer Reviewed Referred
Research Journal



इतिहास संकलन संस्था, महाराष्ट्र

इतिहास संकलन पत्रिका

संपादक : प्रा.डॉ. राधाकृष्ण जोशी

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

[illegible]

ISSN – 2250-0383

International History Referred & Reviewed Research Journal

# SHODHANKAN

CHIEF EDITOR : Dr. RADHAKRISHNA L. JOSHI
ASSOCIATE EDITOR : Dr. NITIN ULHASRAO SARAF

**EDITORS' BOARD**

Dr. Venkatesh Lamb
Dr. Vinod Raipure
Dr. Shanta Gite Jadhavar
Dr. Pallavi Tajane

**Manager**

Smt. Rashmi Patil

**Publisher**

ITIHAS SANKALN SANSTHA

The Editor, Editorial Board and Publisher assume no Responsibility for statements and opinions expressed by the Author in this Research Journal

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

## CHIEF ADVISOR

Dr. Sharad Hebalkar

## ADVISORY BOARD

Dr. Deglurkar G.B. Dr. Ambade K.M.

Dr. Dande Sadashiv Dr. Kadam Satish

### Referred & Review Panel

| SR No | Name of Refered | Mobile No. | E-Mail Id. |
|---|---|---|---|
| 1 | Dr. Shirsat Dipak | 8657128007 | dsshirsat79@gmail.com |
| 2 | Dr. Kulkarni B.G. | 9975964140 | drbgk68@gmail.com |
| 3 | Dr. Kavita Tathed | 9421770159 | drkavitatated@gmail.com |
| 4 | Dr. Smita Jadhav | 8208865157 | Smitamohod15@gmail.com |
| 5 | Dr. Sathbhal Ravi | 9850488943 | Ravi7bhai@gmail.com |
| 6 | Dr. Jayshree Kulkarni | 9322910208 | Jayashree.jayant@gmail.com |
| 7 | Dr. Natha Mokate | 9410101178 | nathamokate@gmail.com |
| 8 | Dr. Sunil Puri | 8275118440 | sunilpuriausa@gmail.com |
| 9 | Dr. Prashant Sable | 9422295167 | Sable.prashant53@gmail.com |
| 10 | Dr. Pathavkar S.U. | 7588170904 | svpatharkar@gmail.com |
| 11 | Dr. Parikh N.J. | 9824344674 | navkar.naresh@gmail.com |
| 12 | Dr. Sushim Pagare | 9425032465 | sushimpagare@gmail.com |



This Periodical Issue by owner, Printer,and publisher Mrs. NetraRadhakrishna Joshi

Printed at Manoj Printers, Kedgaon Devi, Ahmednagar and Published

at 22b,''Prathmesh''Omkareshwar Bunglow,Savedi Ahmednagar.


Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/ 56/1999 Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
**Savitribai College of Arts**
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

# अनुक्रमणिका


| अ. क्र | लेखाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पान नं. |
|---|---|---|---|
| १. | The Silk City Of Karnataka – Ramanagara | Dr Vasudha.N | १ |
| २. | A study of local history of Aurangabad District | Dr. G. V. Gatti | ४ |
| ३. | Phone Radiation On Harmful: A Special Reference To Jalna City (Maharashtra State) | Dr. Khade Sominath Sarangdhar<br>Chate Vandana Vasantrao | ७ |
| ४. | वर्तमान परिप्रेक्ष्य में स्थानीय इतिहास का महत्त्व | डॉ.शुचिस्मिता मिश्रा | १२ |
| ५. | भारतीय इतिहास लेखन में स्थानिक इतिहास का महत्व | डॉ० सुरेश प्रसाद पाण्डेय | १६ |
| ६. | छत्रपती शाहू महाराज आणि खानदेशातील लामकानी गढी | डॉ. नरसिंह परदेशी - बघेल | १९ |
| ७. | अकोले गावचा स्थानिक इतिहास | डॉ. सुरेंद्र अर्जुन शिरसट | २३ |
| ८. | सुरगाणा संस्थाना संदर्भातील प्रशासकीय स्थित्यंतर: विश्लेषणात्मक अवलोकन | डॉ.शीतल मनोज पंचीकर | ३१ |
| ९. | स्थानिक इतिहासलेखन : संकल्पना, साधने व महत्व | डॉ नवनाथ दत्तात्रय वाजगे | ३६ |
| १०. | स्वातंत्र्योत्तर विसापूर : स्थानिक इतिहास लेखन | डॉ राजेंद्र पोपटराव भामरे | ३९ |
| ११. | लोणार तालुक्यातील बारव स्थापत्य : एक ऐतिहासिक संशोधन | डॉ. किशोर मारोती वानखडे | ४२ |
| १२. | चंद्रपूर येथील मराठा– इंग्रज युध्द(२० मे 1818) | दत्ता तन्नीरवार | ४७ |
| १३. | किल्ले वारुगड : एक दृष्टिक्षेप | प्रा.डॉ. संतोष तुकाराम कदम | ५३ |
| १४. | सुवर्णदुर्ग, कनकदुर्ग, फत्तेदुर्ग व गोवा उर्फ हर्णे किल्ला {शिवकाल ते महाराणी ताराबाई काळ(ई. स. १६३० ई. स. १७०७)} | डॉ ज्योती पेठकर, | ५६ |
| १५. | गाविलगडचा किल्लेदार सरदार बेनीसिंग | डॉ संदीप राऊत | ६५ |
| १६. | यावलीच्या १९४२ स्वातंत्रलढ्यामध्ये जनसामान्याचा सहभाग- एक ऐतिहासिक अध्ययन | प्रा. डॉ. मंजूषा ह.धापूडकर | ६९ |
| १७. | नाशिक मधील सिन्नरच्या नावांच्या उत्क्रांतीचा इतिहास | डॉ.अंजली सोईतकर वेखंडे | ७५ |
| १८. | हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि संतभगवान बाबा | प्रा.कृष्णा उत्तम नागरे | ८१ |
| १९. | समकालिन ऐतिहासिक साधनांद्वारे फैजपूर येथील ग्रामीण राष्ट्रीय कॉंग्रेस अधिवेशनाचा स्थानिक इतिहास-एक अभ्यास | हितेश लिलाधर भोरटक्के | ८८ |
| २०. | 'मिरज तालुक्यातील गोंधळ लोककला आणि कलाकार' | अनुराधा पवार | ९७ |
| २१. | 'शिवकाल : मराठवाडयातील स्थानीक लोकजीवनाचा ऐतिहासीक अभ्यास'' | प्रा. डॉ. राधाकृष्ण ल. जोशी | १०१ |


Savitribai College of Art's * Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar * ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Art's
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. A.Nagar

HISTORY
ISSN – 2250-0383
RNI-02988/13/01/2011-TC

# स्थानिक इतिहासलेखन : संकल्पना, साधने व महत्त्व

डॉ. नवनाथ दत्तात्रय वाजगे,
इतिहास विभाग प्रमुख,
सावित्रीबाई कला महाविद्यालय,
पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.
मो.नं. ८८०५१०९५३७
ई–मेल : ndwajage@gmail.com

इतिहासाचे चार प्रमुख अनुबंध मानले जातात. व्यक्ती, समाज, स्थळ व काळ या चार अनुबंधाच्या आधारावर इतिहासाची मांडणी केली जाते. प्राचीन काळामध्ये 'स्थळ' व 'काळ' या अनुबंधाच्या अंगाने इतिहासलेखन झाले. मध्ययुगामध्ये मुस्लिम इतिहासकारांनी 'व्यक्ती' व 'समाज' हे दोन नवे आयाम इतिहासाला दिले. तर आधुनिक कालखंडात 'परिवर्तन व सातत्य', 'पुराणकथा व वास्तवता', 'परंपरा व आधुनिकता' हे आणखी नवे आयाम इतिहासलेखनाला प्राप्त झाले. या सर्व प्रक्रियेतून इतिहासलेखन समृध्द होत गेले.

इतिहासलेखनात 'स्थळ' हा अनुबंध महत्त्वाचा मानला जातो. जेव्हा स्थळाचा विचार होतो, तेव्हा गावाचा इतिहास, तालुक्याचा इतिहास, प्रादेशिक इतिहास, जागतिक इतिहास या चढत्या क्रमाने इतिहासाची मांडणी करता येते. प्राचीन काळामध्ये 'स्थळ' हा अनुबंध महत्त्वाचा ठरला. तसेच कालगणनेची संकल्पना देखील महत्त्वाची ठरली. ई–श्रीधरण यांच्या मते, "प्राचीन रोमन साम्राज्यामध्ये हेक्याटियस, हेलेनिकस, शारोन आणि डायोनिसियस सारखे लोगोग्राफर होऊन गेले. स्थानिक इतिहास हा त्यांचा मुख्य विषय होता आणि स्थानिक मिथके हा मुख्य स्त्रोत."[१] थोडक्यात प्राचीन काळात रोमन संस्कृतीमध्ये देखील स्थानिक इतिहासलेखनास महत्त्व होते. ज्यामध्ये नगर, तेथील लोक, राजकुमार, मंदिर यांच्याशी संबंधित मौखिक परंपरा आणि दंतकथांच्या आधारावर इतिहासलेखन केले जात होते.

इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी इतिहासाचे आत्मीक, देशीक आणि कालीक अशा तीन प्रकारामध्ये वर्गीकरण केले.[२] यामधील देशिक हा प्रकार म्हणजे 'प्रादेशिक' इतिहासच होय. राजवाडे यांनी इतिहासाची जी संकल्पना मांडली त्यामधून त्यांना 'प्रादेशिक इतिहास' अपेक्षित होता हे स्पष्ट दिसते. इस. १९७८ मध्ये पंजाब इतिहास परिषदेत सेमिल्य बापर यांनी प्रादेशिक इतिहासावरची मांडणी त्यांच्या अध्यक्षीय भा णातून केली होती. डॉ. अरूण टिकेकर व अभय टिळक संपादित 'शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा' या ग्रंथाच्या प्रस्तावनेमध्ये टिकेकरांनी 'स्थानिक इतिहास' ऐवजी 'स्थानिय इतिहास' असा शब्दप्रयोग केला आहे. त्यांच्या मते, Local History या संकल्पनेच्या 'स्थानिक इतिहास' या मराठीकरणात Localised History आणि History of Localities या दोन्ही संकल्पना अंतर्भूत आहेत.[३]

**स्थानिक इतिहासलेखनाची साधने :**

इतिहासलेखनाच्या संदर्भात पाश्चात्य इतिहासकार रांके यांनी 'No Documents, No History' असा शब्दप्रयोग रूढ केला.[४] वस्तुनिष्ठ इतिहासलेखन करत असताना हे वाक्य म्हणजे एक मंत्रच बनला. वास्तविक पाहता शास्त्रशुध्द इतिहासलेखन करत असताना ही एक महत्त्वाची अटच ठरते. डॉ. राजा दीक्षित यांच्या मते, "कागदपत्रे नसतील तर वस्तुनिष्ठ इतिहासलेखन करणे शक्यच होणार नाही. परंतू भारतासारख्या देशामध्ये हा आग्रह एका विशिष्ट मर्यादेपलीकडे ताणता कामा नये. कारण भारताची बहुसंख्य जनता शतकानुशतके निरक्षर होती. त्यामुळे इतिहासाची लेखी साधने त्यांनी मागे सोडली नाहीत. भारताच्या संदर्भात प्रादेशिक व स्थानिक इतिहासलेखन करता असताना रांके यांच्या वरील सुत्राला थोडीशी मुरड घालून मौखिक साधनांचा योग्य व शास्त्रशुध्द अभ्यास करून इतिहासलेखन करणे शक्य आहे."

स्थानिक इतिहासलेखन करत असताना गावाशी, तालुक्याशी संबंधित कागदपत्रे आजही महाराष्ट्रातील अभिलेखागारामधून उपलब्ध होऊ शकतात. उदा. श्रीगोंदा तालुक्याच्या संदर्भात बरीच कागदपत्रे पुणे पुराभिलेखागारामध्ये उपलब्ध आहेत. त्याच बरोबर गावामध्ये ऐतिहासिक वास्तू व त्यांचे अवशेष (उदा. वाडा, मंदिर, वीरगळ, शिलालेख) अस्तित्वात असतात. त्याचा योग्य वापर इतिहासलेखनासाठी करता येईल.

स्थानिक इतिहासलेखन करत असताना मौखिक साधने अतिशय महत्त्वाची ठरतात. ज्यामध्ये दंतकथा, लोकगीते, म्हणी, वाक्यप्रचार यांचा योग्य संदर्भ लावून इतिहासलेखन करता येईल. दामोदर धर्मानंद कोसांबी यांनी पुणे परिसरातील देवतांच्या संदर्भात अतिशय समर्पक मांडणी [...] केली आहे.[५] ज्या ठिकाणी लिखित साधनांचा अभाव आहे, अशा



Savitribai College of Arts
Reg. No. PU/AN/A/58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

ठिकाणी मौखिक साधनांचा वापर करणे आवश्यक आणि योग्यच ठरते. थोडक्यात शासकीय अभिलेखागारे तसेच खाजगी कागदपत्रे, ऐतिहासिक वास्तु, वीरगळ, अभिलेख, मौखिक साधने यांसारख्या साधनांचा योग्य समन्वय साधून स्थानिक इतिहासलेखनाची व्याप्ती वाढवता येईल. प्राचीन काळामध्ये भारतात स्थान महात्म्य सांगणाऱ्या पोथ्या सापडतात. त्या पोथ्या म्हणजे स्थानिक इतिहासलेखनच होय. परंतु यामध्ये मौखिक साधनांचा अशास्त्रीय पध्दतीने वापर केल्यामुळे तसेच इतिहासाची जाण विकसित झालेली नसल्यामुळे तो इतिहास शास्त्रशुध्द मानला गेला नाही.

**स्थानिक इतिहासलेखनाचा आढावा :**

पाश्चात्य देशांमध्ये 'स्थानिक इतिहास' हा प्रकार अतिशय मान्यता पावलेला आहे. इंग्लडमध्ये १६ व्या शतकात स्थानिक इतिहास लेखनास सुरुवात झाली. त्यावेळी फ्रान्समध्ये चर्च, स्थानिक किल्ले, संग्रहालये, घराणी इत्यादींचा इतिहास लिहिला जाऊ लागला. अमेरिकेमध्ये १९ व्या शतकात व्यापारी, उद्योगपती, मिशनरी यांनी आपआपल्या क्षेत्रामध्ये उद्योग व व्यवसाय यांचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली. इंग्लडमध्ये तर स्थानिक इतिहासलेखनावर असंख्य ग्रंथ प्रकाशित झाले. स्थानिक इतिहास कसा लिहावा यावर देखील इंग्लंडमध्ये ग्रंथ प्रकाशित झाले आहे.[६]

भारतामध्ये १९ व्या शतकात प्रादेशिक इतिहास लेखनात सुरुवात झाली. ग्रँट डफकृत 'मराठयांचा इतिहास' (१८२६), जेम्स टॉडकृत 'राजस्थानचा इतिहास' (१८२९) इत्यादी प्रादेशिक इतिहास लेखनासंदर्भातील काही प्रतिनिधिक स्वरुपातील उदाहरणे सांगता येतील. परंतू या लिखाणातील साम्राज्यवादी भावना लपून रहात नाही. त्याला प्रतिक्रिया म्हणून रा.गो. भाडारकरांचा 'दक्खनचा इतिहास' (१८८४), लोकहितवादी यांचा 'गुजरात' (१८८५), 'राजस्थान' (१८९४) यांसारखे राष्ट्रवादी भावनेतून इतिहासलेखन झाले.

प्रादेशिक इतिहासाच्या जोडीने महाराष्ट्रात स्थानिक इतिहासलेखनात भर पडत गेली. त्र्यं.शं. शेजवलकर, 'कोकणच्या इतिहासाची पार्श्वभूमी' (१९६१), गो.ना. माडगावकर, 'मुंबईचे वर्णन' (१८३३), ना.वी. जोशी, 'पुणे शहराचे वर्णन' (१८६८) दे.गो. लांडगे, 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' (१९५४), अरूण टिकेकर व अभय टिळक, 'शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा' (२०००) यांसारख्या ग्रंथांमुळे स्थानिक इतिहास लेखनाची शाखा आणखी समृध्द झालेली आहे. पुणे विद्यापीठाच्या 'समर्थ भारत अभियान' या उपक्रमातंर्गत 'दत्तक गावांचा इतिहास'[७] या शीर्षकाचे स्थानिक इतिहासलेखनाचे पाच खंड आजपर्यंत प्रकाशित झाले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील इतिहास विभागांतर्गत पीएच.डी. या पदवीसाठी स्थानिक इतिहासलेखनावर महत्त्वपूर्ण संशोधन झालेले आहे.

**स्थानिक इतिहासलेखनाचे महत्त्व :**

गावाचा इतिहास लिहिणे हा स्थानिक इतिहासाचा एक भाग आहे. स्थानिक इतिहास हा प्रादेशिक इतिहासाचा एक उपविभाग आहे. एखादया स्थानाभोवती किंवा ठिकाणाभोवती केंद्रित राहून त्या स्थानाचे समग्र इतिहासलेखन करणे म्हणजेच स्थानिक इतिहासलेखन होय. भौगोलिकदृष्टया 'प्रादेशिक इतिहास' ही इतिहास लेखनाच्या प्रांतातील नव्याने उदयास आलेली ज्ञानशाखा आहे. मराठी भाषेतील लेखनविश्वात या शाखेची पावले मोठया प्रमाणात उमटलेली दिसत नाहीत. तरीही महाराष्ट्रातील इतिहास अभ्यासक, साहित्यिक, पत्रकार, इत्यादी अभ्यासकांनी आपल्यालेखनामधून स्थानिक इतिहास लेखनात योगदान दिले आहे. स्थानिक इतिहासलेखनाची दृष्टी आता वाढली आहे.[८]

स्थानिक इतिहास लेखनामध्ये एखादया स्थळासंदर्भातील सर्वच घटनांची उदा. राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी नोंद घेता येत असल्यामुळे त्या स्थळांचा सर्वांगीण इतिहास मांडता येतो. उदा. शांताराम विष्णू आवळसकर यांनी रायगडाच्या संदर्भातील सर्वच घटनांची नोंद लिखीत माहितीच्या व अस्सल कागदपत्रांच्या आधारे घेतलेली आहे.[९] त्यातूनच त्यांचा 'रायगडाची जीवनकथा' हा ग्रंथ या स्थळाचे समग्र वर्णन आपल्या पुढे सादर करतो. एखादया स्थळाचे समग्र चित्रण होण्यासाठी स्थानिक इतिहासलेखनाचा उपयोग होतो.

आधुनिक काळात 'शोषित' किंवा 'वंचितांचा इतिहास' हा एक नवीन प्रवाह इतिहास लेखनात मान्यता पावलेला दिसतो. ज्यामध्ये समाजाच्या अगदी खालच्या स्तरातील उपेक्षित घटकांमधील उदा. शेतकरी, कामगार, आदिवासी, स्त्रिया यांच्या कार्याची नोंद घेतली जाते.[१०] शोषितांच्या इतिहासाची मांडणी करताना स्थानिक इतिहासलेखनाच्या माध्यमातून ती जास्त समर्पकपणे करता येईल. स्थानिक इतिहास लेखनामध्ये लिखित साधनांच्या बरोबर मौखिक साधनांचा वापर केला जात असल्यामुळे नवनवीन साधने प्रकाशात येऊ शकतात. आजही भारतातील बहुसंख्य खेडयामध्ये दंतकथा, लोकगीते, म्हणी यांचा वापर होताना दिसतो त्यामुळे स्थानिक इतिहास लेखनाची व्याप्ती वाढल्यास अशा मौखिक साधनांमध्ये देखील भर पडत जाईल.

स्थानिक इतिहासलेखनाचे महत्त्व स्पष्ट करताना डॉ. राजा दीक्षित लिहितात की, ''प्रादेशिक व स्थानिक इतिहासलेखन हा विशिष्टता व वैश्विकता यांचा समन्वय घडून आणणारा महत्त्वाचा लेखन प्रकार ठरतो. आपल्या गावाशी, प्रदेशाशी निष्ठा ठेवत असताना राष्ट्रवादाची भावना देखील व्यक्ती मनामध्ये बाळगू शकते. मुळात 'विविधतेमध्ये एकता' हे भारताच्या राज्यघटनेमधील महत्त्वाचे तत्त्व असल्यामुळे स्थानिक इतिहासलेखन करत असताना स्वतःच्या प्रदेशाबद्दल



Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/ 58/1989 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

दुराभिमान व इतर प्रदेशाबद्दल आकस ही भावना बाळगणे चुकीचे ठरते. स्थानिक इतिहासलेखन करताना हे भान जर ठेवले तर अतिशय वस्तुनिष्ठ अशाप्रकारे लेखन शक्य आहे.''[११]

तळटिपा

१. ई. श्रीधरन, इतिहास लेख, (हिंदी अनु. मनजीत सिंह सलुजा), नवी दिल्ली २०११, पृ. ९.
२. राजवाडे वि.का. (संपा), मराठयांच्या इतिहासाची साधने, खंड ६, धुळे, २०११.
३. अरुण टिकेकर (संपा.) व अभय टिळक (सहा. संपा.) शहर पुणे : एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, खंड १, पुणे, २०११, पृ. १५.
४. शांता कोठेकर, इतिहास तंत्र आणि तत्त्वज्ञान, नागपूर २००७, पृ. ५९.
५. दामोदर धर्मानंद कोसंबी, पुराणकथा व वास्तवता, (मराठी अनुवाद : वसंत तुळपुळे), २०१२, पुणे.
६. Robert Dunning, Local History for the Beginners, England, 1980.
७. पुणे विद्यापीठात 'समर्थ भारत अभियान' या उपक्रमांतर्गत इतिहास लेखनास प्रोत्साहन देण्यासाठी 'दत्तक गावाचा इतिहास' हा लेखन उपक्रम राबवला जातो.
८. लहु गायकवाड, जुन्नरचा इतिहास (प्राचीन ते अर्वाचीन), अप्रकशित प्रबंध, पुणे विद्यापीठ, पुणे २०११.
९. शांताराम विष्णू आवळसकर, रायगडाची जीवनकथा, मुंबई, २००८.
१०. उमेश बगाडे, 'सबाल्टर्न स्टडीज व भारतीय इतिहास लेखनातील स्थित्यंतर : शोषित अंकितांची 'स्वायत्त' जाणीव व तिचे पोकळ राजकीय अर्थशास्त्र', समाजप्रबोधन प्रत्रिका, जुलै–सप्टेंबर, २००७.
११. राजा दिक्षित, प्रादेशिक इतिहासाचा वर्तमान संदर्भ, त्रैमासिक, इतिहास शिक्षक पुणे, २००८.

PRINCIPAL
Savitribai College of Art's
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. A.Nagar

Savitribai College of Arts ★ ID. No. PU/AN/A/58/1999 ★ Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar



PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar